स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रो. (डॉ.) सदानंद भोसले
एम्.ए., पीएच् डी.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
राष्ट्रीय सेवा योजना
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

रासेयो/२०२४–२५/४६ दि. ०३/०६/२०२४

**प्रति,**
**मा. प्राचार्य/कार्यक्रम अधिकारी**
**पुणे, अहमदनगर व नाशिक**
**रासेयो संलग्नीत महाविद्यालये**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

**विषय : ५ जून, जागतीक पर्यावरण दिनानिमित्त उपक्रम राबवणेबाबत**

महोदय,

उपरोक्त विषयांस अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, जागतिक पर्यावरण दिन हा एक जागतिक कार्यक्रम असून दरवर्षी ५ जून रोजी पर्यावरण संरक्षणाबाबत जागरूकता वाढवण्यासाठी साजरा केला जातो.

मा. राज्यसंपर्क अधिकारी यांनी पाठवलेल्या पत्रान्वये जागतिक पर्यावरण दिनानिमित्त राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत स्वयंसेवक व कार्यक्रम अधिकारी यांच्या सहभागातून **'आमची जमीन'** या घोषवाक्याखाली जमीन पुनर्संचयित करणे, वाळवंटीकरण आणि दुष्काळ प्रतिरोधकता यावर लक्ष केंद्रित करून याबाबत पुढीलप्रमाणे उपक्रम राबवण्यात यावे.

जागतिक पर्यावरण दिना दिवशी करावयाचे उपक्रम.

१) महाराष्ट्रामध्ये सध्या पाण्याची भीषण टंचाई निर्माण झाली आहे. याकरिता पाणी संवर्धनासाठी राबवण्यात येणाऱ्या उपक्रमामध्ये चरी काढणे, तलाव–विहिरी स्वच्छ करणे, छोटे डॅम बांधणे यामध्ये सर्व उपक्रमांमध्ये रासेयो स्वंयसेवकांनी सहभागी होणे.

२) प्राप्त पाण्याचा जपून वापर करण्यासाठी लोकांमध्ये जागृती निर्माण करणारे पथनाट्य, प्रबोधन कार्यक्रम, गृह भेटी, इत्यादि सारखे उपक्रम राबिवणे.

३) पाणी वाचवण्याच्या सवयी जसे की गळके नळ दुरुस्त करणे ज्याद्वारे पाणी वाया जाणार नाही, दात साफ करताना आणि दाढी करताना भांडयामध्ये पाणी घेणे, अंघोळीसाठी शॉवरचा वापर न करणे, सांडपाणी जमिनीत मुरवण्यासाठी शोषखड्डा तयार करणे, वॉशिंग मशीनचा त्याच्या पूर्ण क्षमतेनुसार वापर करणे, आपल्या कल्पकतेनुसार पर्यावरण व पाण्याची बचत बाबत विविध उपक्रम राबविणे.

तरी आपल्या महाविद्यालयामार्फत अधिकाधिक स्वयंसेवक व कार्यक्रम अधिकारी यांच्या सहभागातून वरीलप्रमाणे उपक्रम राबवून, राबवलेल्या उपक्रमांचा अहवाल https://forms.gle/idX9Pv4g6wj3Qkif6 या गुगल लिंकमध्ये दिनांक ६ जून, २०२४ पर्यंत भरण्यात यावा. उपक्रम आयोजनाचा खर्च नियमित कार्यक्रमातून करण्यात यावा.

**संचालक**
**राष्ट्रीय सेवा योजना**

अहवाल नमुना :

| महाविद्यालयाचा रासेयो क्रमांक | महाविद्यालयाचे नाव | राबविण्यात आलेले उपक्रम | सहभागी स्वयसेवकांची संख्या | सहभागी लोकांची संख्या | वाचविण्यात आलेले पाणी लिटर मध्ये |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |